# महाराष्ट्र शासन
## औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

माहितीचा अधिकार

कामगार भवन, ५वा मजला, ब्लॉक - ई, सी-२०, वान्द्रे कुर्ला संकुल, वान्द्रे (पुर्व), मुंबई — ४०० ०५१.
फोन नं. २६५७२५०४/०९/२२/५८, फॅक्स नं. २६५७२४७४,
Email- dish.maharashtra@gmail.com


क. औसुवआ/खटला/ 90269-68

दिनांक :- - 1 SEP 2017

## 'परिपत्रक' क. २/२०१७

**विषय :- न्यायालयामध्ये अधिका-यांच्या उपस्थितीबाबत.....**

असे निदर्शनास आले आहे की, न्यायालयामध्ये खटल्याचे कामकाज पाहण्याकरीता कार्यालयातील सर्व अधिकारी उपस्थितीत राहतात. त्यामुळे कार्यालयीन काम, इतर अपघात चौकशी अथवा कारखाना भेटींची कामे यावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. तसेच कोर्टात हजर राहण्याचा भत्ता (T.A., D. A.) देखील सर्वांना दयावा लागतो. आपल्या कार्यालयाच्या वतीने दाखल करण्यात येणारे खटले हे सर्वसाधारणपणे एकाच न्यायालयात व आठवडयातून एकच दिवस चालत असतात. त्यामुळे सर्व अपर संचालक व सह संचालक यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या विभागातील न्यायालयीन उपस्थितीसाठी कोणत्याही एकाच अधिका-याची नेमणूक करावी व त्या नेमणूकीमध्ये आळीपाळीने बदल करण्यात यावे, जेणेकरुन सर्व अधिकारी उपस्थित न राहता एकावेळी एकच अधिकारी शासनाचा, संचालनालयाचा न्यायालयातील प्रतिनिधी या नात्याने सर्व खटल्यांचे काम करेल. इतर अधिका-यांना त्यामुळे त्याचा पूरावा न्यायालयासमोर असेल तरच कोर्टात उपस्थित रहावे लागेल.

सर्व अपर व सह संचालकांनी त्याप्रमाणे त्वरीत कार्यवाही करुन आपआपल्या विभागामध्ये वरीलप्रमाणे न्यायालयीन उपस्थितीबाबत विहीत आदेश निर्गमीत करावेत. व त्याबाबत संचालनालयाला अवगत करण्यात यावे.

प्रभारी संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत - अपर संचालक औसुवआ, मुंबई, पुणे, नागपूर.
सह संचालक, औसुवआ, मुंबई, ठाणे, वसई, कल्याण,
रायगड, पुणे १, पुणे २, कोल्हापूर, नाशिक, अकोला, औरंगाबाद.